म.सं.कौ.हि.का.क्र.२०/२०२३
कविता वि. गमतीदास
**नि.क्र. ६० खाली**

**गैरअर्जदारतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा उलटतपास अर्जदारातर्फे अधिवक्ता श्री. एन.डी. येरणे यांच्या मार्फत शपथेवर सुरु –**

२. गैरअर्जदार यांना मी जन्मापासुन ओळखतो व अर्जदार हिला गैरअर्जदारासोबत लग्न झालेपासुन ओळखतो. गैरअर्जदार माझा नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार माझे नातेवाईक असल्यामुळे माझे त्याचेसोबत पहिलेपासुन चांगले संबंध आहेत. गैरअर्जदार राजुऱ्याला राहायला आले किंवा कसे याबद्दल मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार यांना प्रियदर्शनी इंदिरा गांधी शाळा, भुरकुंडा येथे शिक्षक म्हणुन नोकरीवर आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदाराला शिक्षक म्हणुन नोकरीवर असतांना जवळपास २५ ते ३० वर्ष झाले. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदारानी शिक्षक म्हणुन नोकरीवर लागल्यानंतर साईनगर वार्ड, राजुरा येथे प्लॉट घेवुन घर बांधले. सन २००९ च्या पुर्वीपर्यंत गैरअर्जराच्या घराचे काम झाले किंवा कसे हे मला माहीत नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार व गैरअर्जदारामधील भांडणाबद्दल मला वैयक्तिक कुठलीही कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार व गैरअर्जदार सन २००९ मध्ये कुठल्या तारीख व महिन्यात माझ्या घरी आले हे मला माहीत नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की त्यांना महिना माहीत आहे. सन २००९ च्या पुर्वी अर्जदार किंवा गैरअर्जदाराकडे मोबाईल फोन होता याबद्दल मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, अजय गिडवानी यांना मी प्रत्यक्ष भेटलो नाही, त्यामुळे तो कुठे राहतो याबद्दल मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रामध्ये सन २००९ मध्ये अर्जदार व गैरअर्जदार माझ्या घरी

आले तेव्हा त्यांचे भांडण झाले व अर्जदारानी रूममध्ये जावुन गोळ्या खाल्याबद्दल मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने कोणत्या गोळ्या खाल्या होत्या याबद्दल मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, बामणवाडा येथुन राजुरा बल्लारशाह पेक्षा जवळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, राजुरा येथे १० ते २० डॉक्टर आहे तसेच ग्रामीण रूग्णालय आहे.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रामध्ये मी गैरअर्जदारासोबत अर्जदार हिला डॉक्टर वाढई, बल्लारशाह यांच्याकडे घेवुन जाण्याबाबत मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार माझे नातेवाईक असल्यामुळे त्याना सदर प्रकरणामध्ये मदत करण्याच्या हेतुने मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष, |
| स्वा/– | स्वा/– |
| (आशू दिनेश पटेल) | (आशू दिनेश पटेल) |
| सह न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.,राजूरा | सह न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.,राजूरा. |
| दिनांक ०३/०७/२०२६ | दिनांक ०३/०७/२०२६ |